लोकमत पु-पा-१.

१० लाख पळविणारे तिघे जेरबंद

# बंदुकीच्या धाकाने नातलगांनीच लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दूध विक्री करणाऱ्या व्यावसायिकाच्या घरात शिरून बंदुकीच्या धाकावर १० लाखांची लूट करणाऱ्या तिघा आरोपींना काशिगाव पोलिसांनी अटक केली आहे. त्यातील दोघे आरोपी हे व्यावसायिकाचे नातलग आहेत.

काशिगावच्या माशाचा पाडा मार्गावरील मनाली व्हिलेज, जनता नगरमधील म्हाडा इमारतीत मोहम्मद आदिल इलियास अहमद (वय २९) हे कुटुंबासह राहतात. त्यांचा दूधविक्रीचा व्यवसाय असून, रोजचे व्यवसायाचे पैसे ते घरी ठेवत असत. ३० सप्टेंबरच्या पहाटे ५ च्या सुमारास आदिल यांच्या घराचा दरवाजा कोणीतरी ठोकला असता त्यांच्या पत्नीने दार उघडले. दार उघडताच बुरखा घातलेले दोन पुरुष आणि एक महिला जबरदस्तीने घरात शिरले.

बुरखाधारी महिलेने आदिल यांच्या पत्नीला बेडवर ढकलून धरून ठेवले, एका बुरखाधारीने पिस्तूल काढून आदिल यांच्या तोंडात दाबले. तर, दुसऱ्या लुटारूने शयनगृहात जाऊन दारामागील १० लाख रुपये रोकड ठेवलेली बॅग घेतली. पैसे घेऊन तिघेही पळून गेले. उपायुक्त प्रकाश गायकवाड आणि सहायक आयुक्त डॉ. विजय मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील व पोलिस अधिकारी-कर्मचारी यांनी तपासाला सुरुवात केली.




■ आरोपी कामरान हा आदिल यांच्या भावोजीचा भाऊ, तर जुबेर हा आदिल यांचा भाचा आहे. तर जुबेर हा कामरान याचा पुतण्या आहे. पोलिस उपनिरीक्षक किरण बघडाणे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## आरोपी परिचयातील असल्याचा संशय

लुटीच्या घटनेत सहभागी महिला व आरोपीना दूध व्यवसायाची रोकड कुठे ठेवली जाते याची माहिती असल्याने गुन्हा करणारे हे आदिल यांच्या परिचयातील असल्याचा पोलिसांना संशय होता. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही, तसेच माहितीच्या आधारे जुबेर फुरखान शेख (वय २३), कामरान इसहाक शेख (वय १९, दोघेही रा. १०१, स्टार बिल्डिंग, झेड. बी. झकरिया हायस्कूलसमोर, बुरहान चौक, नालासोपारा पश्चिम) व इकरारजहा मोहम्मद शफीक सिद्दिकी (वय २१, रा. रफिक कंपाऊंड, ख्वाजा गरीब नवाज मस्जिद, वाकनपाडा, नालासोपारा पूर्व) या तिघांना मंगळवारी अटक केली.



पोलिसांनी आरोपींकडून हस्तगत केलेला ६ कोटी ९० लाखांचा मुद्देमाल फिर्यादी नागरिकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते परत केला गेला.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिला गेला तक्रारदारांना मुद्देमाल

## फसवणूक, चोरीच्या गुन्ह्यातील ऐवज

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मीरा-भाईंदरमध्ये घडलेल्या फसवणूक, चोरी आदी २६ गुन्ह्यांतील पोलिसांनी आरोपींकडून हस्तगत केलेला ६ कोटी ९० लाखांचा मुद्देमाल फिर्यादी नागरिकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते परत केला गेला.

मीरा रोडच्या डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात मुख्यमंत्री हे महापालिकेच्या कार्यक्रमास ३० सप्टेंबर रोजी आले होते. त्यावेळी पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुद्देमाल संबंधितांना परत करण्याचा कार्यक्रम घेतला. मीरा भाईंदर परिमंडळ-१ च्या हद्दीत घडलेल्या जबरी चोरी, घरफोडी, चोरी, ऑनलाइन फसवणूक, अपहार, फसवणूक आदी स्वरूपाच्या २६ गुन्ह्यात मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांनी यश मिळवले.

### पोलिसांची कामगिरी

मीरा-भाईंदरमधील विविध पोलिस ठाण्यातील व सायबर पोलिस ठाण्यातील या २६ गुन्ह्यांत परत मिळवलेले ६८ लाख ९० हजार रुपये किमतीची ४६ वाहने, १४ लाख ,८४ हजार रुपये किमतीचे १२५ मोबाइल, ४४ लाख ४६ हजार रुपये किमतीचे सोने व रोख रक्कम, ऑनलाइन फसवणूक झालेली २ कोटी ४६ लाख ३५ हजारांची रक्कम असा एकूण ३ लोटी ७४ लाख ५५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल, तर सायबर पोलिस ठाण्याने विविध गुन्ह्यात परत मिळवलेला ३ कोटी १४ लाख ९६ हजार रुपयांचा रक्कम व मुद्देमाल असा एकूण ६ कोटी ८९ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल फिर्यादींना मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते दिला गेला. यावेळी आ. प्रताप सरनाईक, आ. गीता जैन, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलिस उपआयुक्त प्रकाश गायकवाड, महापालिका आयुक्त संजय काटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

लोकमत

पु-पा-१

पा-नं-१

पु-पा-१.

## गाळा, रूमच्या नावे फसवणूक

**नालासोपारा :** वाळकेश्वर येथे राहणारे लालजी रजक (वय ४७) यांची गाळा व २ रूमच्या नावावर २००८ ते २०१२ दरम्यान लाखोंची फसवणूक झाली आहे. आरोपी रवींद्र सिंह याने एक दुकानाचा गाळा व २ रूम देतो, असे सांगून लालजी यांच्याकडून रोख व चेकच्या स्वरूपात १५ लाख ५० हजार रुपये घेतले. मात्र, रूम व गाळा न देता व घेतलेले पैसेही परत न करता फसवणूक केली. तुळींज पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेत आत्महत्या



**नालासोपारा :** टाकी रोडच्या मथुरा नगर येथील प्रियदर्शनी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या मनीष परब (वय २५) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने कोणत्या तरी कारणावरून मंगळवारी राहत्या घराच्या बेडरूममध्ये एका हुकाला इस्त्रीच्या वायरच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून काढले ५५ हजार

## फसवणूक करणारे दोन सराईत गजाआड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** हातचलाखी करून एटीएमची अदलाबदली करीत फसवणूक करणाऱ्या दोन सराईत आरोपींना अटक करण्यात पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आल्याचे जनसंपर्क अधिकारी श्रीराम करांडे यांनी सांगितले.

वाकणपाड्याचे रमाकांत मोहंती (वय २२) २१ सप्टेंबरला धानिवबाग येथील इन्डसइंड बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यास गेले असता आरोपीने कार्डची अदलाबदली करून ५५ हजार ४५० रुपये काढले.

### सीसीटीव्ही तपासले

पेल्हार पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या आदेशान्वये परिसरातील सीसीटीव्ही तपासले. बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे महेश धनगर (वय २७) आणि जितेश जाटप ऊर्फ डब्बू (वय २९) या दोघांना ताब्यात घेतले.

### चौघांनी मिळून केला गुन्हा

आरोपीकडे तपास केल्यावर त्यांनी व त्यांचे दोन साथीदार या चौघांनी मिळून गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. महेशवर ९, तर जितेशवर ३ गुन्हे दाखल आहेत.

## नालासोपाऱ्यात गांजा पकडला



**नालासोपारा :** नालासोपारा पोलिसांनी सोमवारी रात्री ३ वाजण्याच्या सुमारास गस्ती दरम्यान पश्चिम रेल्वेच्या ओव्हर ब्रीज खाली गांजा पकडला आहे. आरोपी अजय चौरसिया (वय ४०) याने आपले कब्जात १४ हजार रुपये किमतीचा ७७० ग्रॅम वजनाचा गांजा विक्रीसाठी आपले कब्जात बाळगला होता. पोलिस अंमलदार बाबासाहेब बनसोडे यांनी नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपीला अटक करत गांजा व १०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.

## नालासोपाऱ्यात रिक्षाची चोरी

**नालासोपारा :** नायगावच्या सोमेश्वर नगरमधील लालसिंग चाळीत राहणारे रिक्षाचालक अजयकुमार यादव (३२) यांची ५० हजार रुपये किमतीची रिक्षा चोरीला गेली आहे. २१ सप्टेंबरला रात्री चाळीसमोरील मोकळ्या जागेत पार्किंग केलेली रिक्षा चोरट्याने चोरून नेली आहे. नायगाव पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पु.पा-१.

# मुलीची छेड काढणाऱ्यास चोप

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेला अल्पवयीन मुलींचा पाठलाग करून त्यांच्या घरात डोकावणाऱ्या एका तरुणाला मनसे कार्यकर्त्यांनी चोप दिला. त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत पोलिसांनी अटक केली आहे.

मंगळवारी हा प्रकार घडला. धीरज गोरे (२५) हा मुलींचा पाठलाग करत होता. मुलीनी हा प्रकार आपल्या आईला सांगितला. महिलेने घराबाहेर लावलेल्या सीसीटीव्हीत तरुण घरात डोकावत असल्याचे कॅमेऱ्यात कैद झाले. मंगळवारी रात्री मनसे कार्यकर्त्यांनी आरोपीला पकडून चांगलाच चोप देत पोलीस ठाण्यात नेले. यावेळी पोलिसांनी त्याला अटक करत गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पा-१.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा घोडबंदरला

## डागडुजीनंतर किल्लाही नव्या स्वरूपात लोकांना पाहता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** घोडबंदर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. तर घोडबंदर किल्ल्याच्या डागडुजीनंतर तो नव्या स्वरूपात लोकांना पाहता येणार आहे, तर संगीत चलचित्रांवरची कारंजीचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे.

घोडबंदर महामार्गावरील मुख्य जंक्शनवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला गेला आहे. २० फूट रुंद चौथऱ्यावर ३० फूट उंचीचा हा पुतळा आहे. त्याचे अनावरण सोमवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते केले गेले. घोडबंदर किल्ल्याला गतवैभव प्राप्त व्हावे म्हणून पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली बुरुज, तटबंदी, खोल्या आदींची डागडुजी केली गेली आहे.



घोडबंदरच्या मुख्य जंक्शनवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला गेला आहे. २० फूट रुंद चौथऱ्यावर ३० फूट उंचीचा हा पुतळा आहे.

### तलावामध्ये अत्याधुनिक संगीत कारंजी

- भाईंदरच्या नवघर तलाव आणि काशिमीरा जरीमरी तलावामध्ये अत्याधुनिक पद्धतीने संगीत कारंजी उभारण्यात आली आहे. त्या कारंज्यांवर चलचित्राचा शो होणार आहे.
- शहरात पहिल्यांदाच अशी कारंजी उभारली गेली असून नागरिकांना त्याचा आनंद घेता येणार आहे. मीरारोड येथील अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह इमारतीच्या तळ मजल्यावरील ८०० तर पहिल्या मजल्यावरील १ हजार आसन. क्षमतेच्या सभागृहाचे लोकार्पण केले गेले.

### मान्यवरांची उपस्थिती

भाईंदर पूर्वेच्या आझादनगर जवळ उभारलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनाचे लोकार्पण केले गेले, परंतु त्याचे अजून अंतर्गत काम काही प्रमाणात बाकी असल्याने ते प्रत्यक्षात सुरु होण्यास काही दिवस जाणार आहेत. काम पूर्ण नसताना त्याचे औपचारिक उद्घाटन हे विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची शक्यता पाहता केले गेल्याचे सांगितले जात आहे. आमदार प्रताप सरनाईक व गीता जैन, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, महापालिका आयुक्त संजय काटकर, माजी आमदार रवींद्र फाटकसह पालिका अधिकारी आदी उपस्थित होते.

## घरात डोकावले; गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या भाईंदर पोलिस ठाणे हद्दीत एक महिला आणि तिच्या दोन मुली राहात असलेल्या घराच्या खिडकीतून रात्री-अपरात्री डोकावणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेस आपल्या दोन मुलींसह राहणाऱ्या महिलेने मनसेच्या मीरा-भाईंदर विधानसभा महिला अध्यक्ष वैशाली येरुणकर यांना त्याच भागात राहणारा धीरज गोरे (वय २५) या तरुणाबद्दल तक्रार केली होती. गोरे हा रात्री-अपरात्री घरात डोकावून बघत असतो, अशा तक्रारीनंतर येरुणकर यांनी महिलेस सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यास सांगितले.

मंगळवारी गोरे हा पहाटे ४ च्या सुमारास महिलेच्या घराच्या खिडकीतून डोकावताना आढळून आला. त्याची माहिती मिळाल्यानंतर मंगळवारी रात्री मनसेच्या येरुणकरसह विधानसभा अध्यक्ष सचिन पोपळे, उपशहर अध्यक्ष अभिनंद चव्हाण, सचिव प्रकाश शेलार, केतना पाटील, उपशहर अध्यक्ष उषा डिमेलो, विभाग अध्यक्ष नीलेश परमार या मनसैनिकांनी गोरे याला पकडून चोप देत नंतर त्याला भाईंदर पोलिसांच्या ताब्यात दिले.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा-नं ५.

# गरबा-दांडियातही राजकारण्यांचा होतोय शिरकाव

## मीरा-भाईंदर शहरात आजपासून नवरात्रोत्सवास प्रारंभ

**पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलिस उपआयुक्त, सहायक पोलीस आयुक्तांसह ३०० पोलीस अधिकारी व २५०० अमलदार बंदोबस्तासाठी असणार आहेत. प्रत्येक परिमंडळात एक दंगलग्रस्त पथक आहे. याशिवाय वाहतूक पोलीस, गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यावरही गस्तीची जबाबदारी आहे. बाहेरून दोन एसआरपी तुकडी व २५० होमगार्ड यांना बंदोबस्तासाठी नेमण्यात आले आहे. गरबा चालू असलेल्या ठिकाणी वारंवार भेटी देऊन कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची पोलीस विभागाकडून दक्षता घेतली जाणार असल्याचे पोलीस उप आयुक्त प्रकाश गायकवाड यांनी सांगितले.**

नामदेव काशिद

मीरारोड : महाराष्ट्रात दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. मीरा-भाईंदर शहरात आजपासून नवरात्रोत्सव सुरू होत आहे. आगामी काळात विधानसभा, महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा शहरातील विविध पक्षाच्या राजकीय नेत्यांकडून ठीकठिकाणी गरबा- दांडियाचे आयोजन करण्यात आले आहे.

मीरा भाईंदर शहरात सार्वजनिक मूर्ती १८५, खासगी ३२२ व देवीचे फोटो सार्वजनिक ठिकाणी ३५७ व खासगी ४५० आणि घटस्थापना सार्वजनिक ठिकाणी ४५१ आणि खासगी ८९८ ठिकाणी असे एकूण ३६६३ ठिकाणी नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. कायदा सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी शासन व पोलीस प्रशासनाकडून बंधने घालण्यात आली आहेत. नवरात्री मध्ये वाजविण्यात येणारे वाद्य व लाऊड स्पिकरच्या आवाज हा मर्यादेपेक्षा जास्त असू नये, तसेच ध्वनिप्रदूषण व वेळेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होणार आहे.


मीरा रोड येथे काँग्रेसचे माजी नगरसेवक राजीव मेहरा यांची सर्वात जुनी व मोठी नवरात्री होती. येथे शहरातील व शहराबाहेरील रसिक गरबा- दांडिया खेळण्यासाठी येत होते. यंदाही मेहरा यांच्या एकता ग्रुपतर्फे शीतल नगर येथे नवरात्रोत्सव साजरा होणार आहे. पूर्वी शिवसेनेत असलेले व नुकतेच भाजपमध्ये गेलेले शंकर वीरकर १४ वर्षांपासून त्यांच्या नागोबा फाऊंडेशनकडून स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानात नवरात्रोत्सव आयोजित करतात. सहा वर्षांपासून माजी आ. नरेंद्र मेहता हे लोटसच्या नावाने नवरात्रोत्सवाचे भाईंदर पश्चिम येथे आयोजन करतात. आ. प्रताप सरनाईक यांच्या प्रताप फाउंडेशनच्या माध्यमातून रामदेव पार्क परिसरात नवरात्रोत्सव साजरा करणार आहेत. यावेळी सुप्रसिद्ध भावीन शास्त्री हे गायक आहेत. शहरातील माजी नगरसेवकांकडून विविध ठिकाणी गरब्याचे आयोजन करण्यात आले आहे. विविध संस्था, सोसायट्या, राजकीय पक्षाच्या वतीने नवरात्र उत्सव, रास गरबा, दांडियाचे आयोजन केले आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यातील अधिकारी, अंमलदार, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, ट्रॅफिक वॉर्डन इ. त्यांच्या हद्दीत बंदोबस्त ठेवणार आहेत.



# घोडबंदर किल्ल्याची देखभाल व निगा राखणार कोण?

## देखभाल मुदतवाढीचा निर्णय पुरातत्त्व विभागाकडून प्रलंबित

**किल्ल्याचे लोकार्पण तर झाले, परंतु किल्ल्याची देखभाल व निगा कोण राखणार, यावर तूर्तास संभ्रम निर्माण झाला आहे. लवकरात लवकर पुरातत्त्व विभागाने हा निर्णय घेऊन शिवप्रेमी व किल्लेप्रेमीसाठी किल्ला खुला करून द्यावा, अशी मागणी केली आहे.**



मीरा रोड : मीरा-भाईंदर शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेल्या घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन, तसेच सुशोभीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. त्याचे लोकार्पण ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मात्र किल्ल्याचे संवर्धन व सुशोभीकरणासाठी राज्याच्या पुरातत्त्व विभागाने मीरा-भाईंदर महापालिकेला दिलेली मुदत २४ जून रोजी संपुष्टात आली. त्यामुळे किल्ल्याचे लोकार्पण तर झाले, परंतु याची देखभाल व निगा कोण करणार, हा संभ्रम निर्माण झाला आहे.

मीरा-भाईंदर शहरातील दुर्लक्षित झालेल्या ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून शिवप्रेमी व किल्लेप्रेमींकडून केली जात होती. त्यानंतर पुरातत्त्व विभागाने संवर्धन व सुशोभीकरण करण्याची परवानगी दिली. घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनासह सुशोभीकरणासाठी राज्याच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचलनालयाकडून महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेंतर्गत मीरा-भाईंदर महापालिकेला १८ जुलै २०१९ रोजी परवानगी देण्यात आली. करारनाम्यातील टी-शर्तीनुसार घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनासह त्यातील सुशोभीकरणाला पुरातत्त्व विभागाकडून महापालिकेला पाच वर्षांची मुदत देण्यात आली. नंतर शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने या किल्ल्याची देखभाल करण्यासाठी दहा वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पुरातत्त्व विभागाकडे केली आहे. परंतु यावर पुरातत्त्व विभागाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु-पा-३.

# फेरीवाल्यांविरोधात नागरिकांचे आंदोलन

लोकसत्ता वार्ताहर



**भाईंदर :** मिरा रोडमध्ये स्थानिक नागरिक आणि फेरीवाल्यांविरोधात वाद निर्माण झाला आहे. शांती नगर परिसरात फेरीवाल्यांरोधात नागरिकांनी तब्बल ४ तास ठिय्या आंदोलन केले.

मिरा रोड येथील शांतीनगर परिसरात मागील पाच महिन्यापासून फेरीवाल्यांना बसण्यास महापालिकेने मज्जाव केला आहे. त्यामुळे अशा फेरीवाल्यांची प्रशासनाने जवळील अय्यपा मंदिर शेजारी असलेल्या नाल्यावर बसण्याची सोय केली आहे. मात्र हा परिसर मुख्य मार्गापासून लांब असल्याने तसेच त्याठिकाणी देखील नागरिकांचा विरोध असल्यामुळे फेरीवाले पुन्हा पूर्वीच्या जागी येऊन बसण्याचा प्रयत्न करत आहे. दरम्यान मंगळवारी हे फेरीवाले दुपारीनंतर येथील सेक्टर २ आणि ८ ठिकाणी असलेल्या रस्त्यावर बसण्यासाठी आले असता यास स्थानिक नागरिकांनी विरोध केला. हे प्रकरण वाढू लागल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी रस्त्यावरच ठिय्या आंदोलन केले. सदर ठिकाणी पुन्हा फेरीवाले बसू लागल्यास वाहतूक कोंडीसह अन्य समस्या उद्भवणार असल्याचा आरोप स्थानिक नागरिक रणवीर वाजपायी आणि हेतल परमार यांनी केला आहे. येत्या काही दिवसांत यावर सविस्तर बैठक घेऊन निर्णय घेणार असल्याचे आमदार गीता जैन यांनी सांगितल्यानंतर प्रकरण रात्री उशिरा शांत झाले.

लोकसत्ता पु-पा-४.

# मुलींची छेड काढणाऱ्याला अटक

**भाईंदर :** अल्पवयीन मुलींचा पाठलाग करून त्यांच्या घरात डोकावणाऱ्या एका तरुणाला भाईंदर पोलिसांनी आरोपीला पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या आरोपीला पकडण्यासाठी मुलींच्या आईने घराबाहेर सीसीटीव्ही कॅमेरा लावला होता.

भाईंदर पश्चिमेला एक महिला आपल्या दोन अल्पवयीन मुलींसह रहात होती. मागील दोन महिन्यापासून धीरज गोरे नावाचा एक तरुण मुलींचा पाठलाग करत होता. त्यामुळे मुलींना असुरक्षित वाटत होते. मुलींनी हा प्रकार आपल्या आईला सांगितला. या गोष्टीची खात्री पटावी म्हणून महिलेने सीसीटीव्ही कॅमेरे लावले.

# प्रेयसीच्या मदतीने १० लाखांची लूट

गुन्हे वृत्त

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

## वाहनामुळे प्रकरणाचा छडा

**या चोरीचा तपास करण्यासाठी काशिगाव पोलिसांनी पथके तयार केली. सीसीटीव्हीवरुन आरोपीचा माग काढण्यात आला. पोलिसांना चकमा देण्यासाठी आरोपी घरातून निघाले आणि एका रिक्षात बसले. त्या रिक्षातून काही अंतरावर एका वाहनातून पसार झाले. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे त्या वाहनाचा क्रमांक मिळवला आणि त्याचा मालकाचा शोध घेतला. नया नगर येथील व्यक्तीने ती कार नालासोपारा येथील एका २३ वर्षीय झुबेर नावाच्या तरुणाला विकली होती. पोलीस त्या तरुणाकडे गेल्यावर धक्का बसला. कारण तो तरुण फिर्यादी याचाच भाचा निघाला. त्याने आपल्या प्रेयसी आणि आणि काकाच्या मदतीने ही लुटीची योजना बनवली होती, अशी माहिती काशिगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल पाटील यांनी दिली.**

**वसई :** 'लोन ॲप'वर झालेले कर्ज फेडण्यासाठी एका तरुणाने आपल्या प्रेयसीच्या मदतीने मामालाच बंदुकीच्या सहाय्याने धाक दाखवून १० लाख रुपये लुटल्याची घटना मिरा रोड येथे घडली आहे. काशिगाव पोलिसानी या प्रकरणी तपास करून या तरुणासह तिघांना अटक केली.

मिरा रोड पूर्वेच्या काशिवाग येथील जनता नगरमध्ये आदील अहमद पत्नी आणि दोन भावांसह राहतात. त्यांची दुधाची एजन्सी आहे. आदील हे अपंग असल्याने ते वितरणासाठी जात नाहीत. सोमवारी पहाटे चारच्या सुमारास आदील यांचे दोन्ही भाऊ दूध वितरणासाठी गेले होते.

त्यावेळी आदील आणि त्यांची पत्नी घरात एकटी होते. अचानक दार उघडून तीन अनोळखी इसम घरात शिरले. त्यांनी बुरखा घातला होता. त्यामध्ये एक महिला होती. त्यांनी बंदुकीचा धाक दाखवून आदील आणि त्यांच्या पत्नीला बांधले.

यावेळी घरात असलेली १० लाख रुपयांची रोकड घेऊन पळ काढला. अवघ्या ५ मिनिटिता हा लुटीचा थरार घडला होता.

Scanned with OKEN Scanner

म.टा-५-पा.१.

# पोलिस दलाला बळकटी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी १,०८२ पदे निर्माण करण्यास मंजुरी

**भाविक पाटील, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी नव्याने आणखी १,०८२ पदे निर्माण करण्यासह त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागाकडून तसे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामुळे पोलिस दलाला आता अतिरिक्त बळ प्राप्त होणार आहे. त्यांच्या मदतीने मिरा-भाईंदर आणि वसई विरार या दोन्ही शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यास मोठी मदत होणार आहे.

मिरा-भाईंदर व वसई विरार परिसराचे वाढते शहरीकरण लक्षात घेऊन ठाणे ग्रामीणमधील मिरा-भाईंदर तर पालघर जिल्ह्यातील वसई-विरार येथील पोलिस ठाण्यांना एकत्रित करत मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाची स्वतंत्र निर्मिती करण्यात आली आहे. या आयुक्तालयाच्या प्रत्यक्ष कामकाजाला ऑक्टोबर २०२० मध्ये सुरुवात झाली. या अखत्यारित असणाऱ्या पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे सुमारे २ हजार कर्मचारी हे आयुक्तालयात वर्ग करण्यात आले.



### आगामी भरती प्रक्रियेत...

पोलिस आयुक्तालयाकडून सध्या भरती प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे ही पदे तात्काळ भरणे शक्य होणार नाही. म्हणून, आगामी काळात भरती प्रक्रिया करून ही पदे भरली जाणार आहेत. तर, इतर पदे ही विविध पोलिस कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बदलीद्वारे सामावून घेतले जाणार असल्याचे आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

**“ नव्या पदांना राज्य सरकारची मंजुरी मिळाल्याने पोलिस दलाल अतिरिक्त मनुष्यबळ प्राप्त होणार आहे. यामुळे आता अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्यास व त्याच बरोबर त्यांच्या तक्रारीचे कमी कालावधीत निवारण करण्यास पोलिसांना मोठी मदत होणार आहे.**

**- मधुकर पांडेय- पोलिस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालय**

यासह पहिल्या टप्प्यातील मजूर करण्यात आलेली १,०२२ पदे भरती प्रक्रिया राबवत मधल्या काळात भरण्यात आली आहेत. मात्र, त्यानंतरही उपलब्ध मनुष्यबळ अपुरे पडत असून कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण येत आहे. परिणाम अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासत होती. म्हणून राज्य सुरक्षा बलाच्या ५०० सुरक्षा जवानांची मदत दोन वर्षांपासून पोलिस दलाकडून घेतली जात आहे.

आयुक्तालयाच्या हद्दीत दर महिन्याला सरासरी ४०० गुन्हे घडत असून हे प्रमाण वाढतच आहे. त्यांचा तपास करून गुन्ह्यांची उकल करणे. वाहतूककोंडीची मोठी समस्या निर्माण झाल्याने त्यावर नियंत्रण मिळवणे. नव्याने सुरू करण्यात आलेली काही पोलिस ठाण्यात मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. तसेच आंदोलन, मोर्चे, राजकीय नेत्यांच्या दौऱ्यानिमित्त बंदोबस्त तैनात करणे आदी कारणे आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयाकडून दुसऱ्या टप्प्यात आणखी १,०८२ पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठवला होता.

Scanned with OKEN Scanner

सामना पा. नं. ७.

# भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहतांनी दोन पत्नी, तीन अपत्यांची माहिती लपवून लाभाची पदे उपभोगली

## निवडणूक आयोगाविरोधात हायकोर्टात याचिका

भाईंदर, दि. २ (सा.वा.) - पार्टी विथ डिफरन्स असा डांगोरा पिटणारे भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांचे भांडे अखेर फुटले आहे. दोन पत्नी व तीन अपत्ये असूनही माहिती लपवून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीमध्ये नगरसेवक पदापासून आमदारकीपर्यंत लाभाची सर्व पदे उपभोगली. निवडणूक आयोगाला मात्र थेट बनावट शपथपत्रे सादर करून मेहता यांनी त्यात खोटी माहिती दिल्याचे उघडकीस आले आहे. निवडणूक आयोगाच्या विरोधातच मीरा रोडमधील सामाजिक कार्यकर्ते राजू गोयल यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून नरेंद्र मेहता यांना यापुढे कोणतीही निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दाखल झालेल्या याचिकेमुळे मीरा-भाईंदरच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

### इन्कारही केला नाही

मेहता यांच्या विरोधात मीरा रोड पोलीस ठाण्यात २८ फेब्रुवारी २०२० रोजी दाखल बलात्काराच्या गुन्ह्यातील फिर्यादी पीडित महिलेने मेहता यांनी २००१ साली मंदिरात लग्न केल्याचे म्हटले आहे. तसेच तिला मेहता यांच्यापासून मुलगा असल्याचेही नमूद केले आहे. सदरच्या रिट पिटीशनमध्ये नरेंद्र मेहता यांनी न्यायालयाला सत्य प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यात मेहता यांनी त्यांचे पीडिता महिलेसोबत १९९९ ते २०२० पर्यंत आपले संबंध होते असे कबूल केले आहे. तिच्यापासून आपल्याला एक मुलगा झाला असल्याचा इन्कारही त्यांनी केलेला नाही.



माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्याविरोधात आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल झाले असून सर्व निवडणुका लढवताना निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात दोन बायका व तीन अपत्ये असल्याची माहिती मेहता यांनी लपवली असल्याचा आरोप राजू गोयल यांनी आपल्या याचिकेत केला आहे. त्यांनी मीरा-भाईंदर महापालिकेच्या २००२, २००७ व २०१२ अशा तीन वेळा निवडणुका लढवल्या. त्यानंतर तीन वेळा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणातदेखील ते उतरले होते. मात्र त्यांनी आपणास दोन पत्नी व तीन अपत्ये असल्याची माहिती निवडणुकीच्या वेळी लपवली.

### ही घ्या गुन्ह्यांची यादी

■ नरेंद्र मेहता हे २००२ साली नगरसेवक असताना त्यांना २० हजारांची लाच घेताना लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले होते. ■ २०२२ साली नवघर पोलीस ठाण्यात अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ■ बलात्कार, पर्यावरणाचा ऱ्हास, जमिनीवर कब्जा करणे यांसारखे २५ हून अधिक गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. ■ पदाचा दुरुपयोग करत आपल्या पंचतारांकित क्लबला बेकायदा चटई निर्देशांक मंजूर करून घेतले आहेत.

■ २०१४ रोजी झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नरेंद्र मेहता हे भाजपचे अधिकृत उमेदवार होते. त्यासंदर्भातील प्रतिज्ञापत्रात त्यांना एक पत्नी व दोन मुले असल्याचे शपथपत्राद्वारे घोषित केलेले आहे.

■ प्रत्यक्षात मेहता यांना दोन बायका असून पहिल्या पत्नीपासून एक व दुसऱ्या पत्नीपासून दोन अपत्ये आहेत. निवडणूक लढवताना त्यांनी खरी माहिती शपथपत्रात दिली नाही. त्यामुळे ही लोकशाहीची चेष्टा असल्याचे याचिकेत नमूद केले आहे.

■ मेहता यांना भविष्यात कोणतीही निवडणूक लढवण्यास मनाई करावी अशी याचिका सामाजिक कार्यकर्ते राजू गोयल यांनी २६ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाकडे केली होती. पण तेथे न्याय न मिळाल्याने त्यांनी आता थेट हायकोर्टात धाव घेतली आहे.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु-पा-४.

# भांजा ही निकला डकैती का मास्टर माइंड

## बुर्का पहन कर लूट लिए थे 10 लाख रुपए

■ **भाईंदर, (सं).** अपने मामा के घर डकैती डालने वाले मास्टर माइंड भांजे को उसके महिला और पुरुष मित्र के साथ काशीगांव पुलिस ने वारदात के महज 24 घंटों में गिरफ्तार कर लिया. पुलिस से प्राप्त जानकारी के अनुसार 30 सितंबर की सुबह 2 पुरुष और एक महिला काले रंग का बुर्का पहन कर शिकायत कर्ता आदिल अहमद के घर में जबरदस्ती घुस गए थे और नकली पिस्तौल दिखाकर घर में रखे 10 लाख रुपए नगद लूट कर फरार हो गए थे. जिसकी शिकायत आदिल ने काशी गांव पुलिस थाने में दर्ज कराई थी.




### 24 घंटे में 3 आरोपी गिरफ्तार

आदिल ने पुलिस को बताया कि वह तीन भाई मिलकर 8 वर्षों से दूध का व्यापार कर रहे हैं. अमूल डेयरी के वे वितरक हैं. विगत 27 से 29 सितंबर के बीच दूध की बिक्री से 10 लाख रुपये जमा हुए थे. बैंक में छुट्टी होने के कारण रुपये घर में ही रखे थे. इसके बाद वरिष्ठ पुलिस निरीक्षक राहुल कुमार पाटिल ने जांच शुरू की. महज 24 घंटे के भीतर काशी गांव पुलिस ने 3 आरोपियों को अरेस्ट किया.

नवभारत पु-पा-२.

# गरबा में केवल हिंदुओं को ही मिले प्रवेश: रमेश शिंदे

## आयोजकों से हिंदू जनजागृति समिति का आह्वान

■ **मुंबई (सं).** नवरात्रि, श्री आदिशक्ति की उपासना, मांगल्य और पवित्रता का पर्व है. आज देशभर में 'लव जिहाद' के माध्यम से हिंदू युवतियों को निशाना बनाए जाने जैसी घटनाएं सामने आ रही हैं. इसलिए नवरात्रि उत्सव में 'लव जिहाद' से महिलाओं की सुरक्षा और उत्सव की पवित्रता बनाए रखना आवश्यक है. ऐसे में जिन लोगों को मूर्ति पूजा मान्य नहीं है, उन्हें देवी की मूर्ति के सामने गरबा खेलने का प्रवेश नहीं दिया जाना चाहिए. गरबा हिंदुओं का धार्मिक उत्सव है. केवल उन्हीं को वहां आना चाहिए जिनकी आस्था हिंदू देवताओं में है. जो मूर्ति पूजा नहीं मानते और गरबा में शामिल होने का प्रयास करते हैं, उनके माध्यम से 'लव जिहाद' का संकट पैदा होने की संभावना है. इसलिए 'लव जिहाद' को रोकने और उत्सव की पवित्रता बनाए रखने के लिए गरबा में केवल हिंदुओं को ही प्रवेश दिया जाए, ऐसा आह्वान हिंदू जनजागृति समिति के राष्ट्रीय प्रवक्ता रमेश शिंदे ने गरबा आयोजकों से किया है.



दैनिक भास्कर पा-नं-३.

# मीरा-भायंदर की पुरानी इमारतों को यूडीसीपीआर के तहत एफएसआई

**भायंदर संवाददाता | भायंदर.** मीरा-भायंदर की पुरानी इमारतें यूनिफाइड डेवलपमेंट कंट्रोल एंड प्रमोशन रेगुलेशन (यूडीसीपीआर) के तहत एफएसआई की हकदार होंगी। ऐसा निर्णय राज्य सरकार ने लिया है। यह जानकारी विधायक प्रताप सरनाईक ने दी। सरनाईक ने बताया कि निर्णय की कॉपी पर मंगलवार को मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने हस्ताक्षर कर दिए हैं। नियमों के मुताबिक, 1984 से पूर्व की सभी इमारतों को यूडीसीपीआर के तहत एफएसआई मिलेगी। उन्होंने बताया कि भायंदर पूर्व के बीपी रोड, नवघर रोड आदि इलाकों में ग्राम पंचायत व नगर परिषद काल की इमारतें बनी हैं। इनमें एफएसआई का काफी उल्लंघन हुआ है। ऐसे में इन बिल्डिंगों का स्वतंत्र पुनर्विकास कठिन था। इसे देखते हुए राज्य सरकार ने नई बिल्डिंगों की भांति पुरानी बिल्डिंगों का विकास भी यूडीसीपीआर नियमों के तहत करने का फैसला किया है। उन्होंने बताया कि 1984 से पहले कि बनी सीसी वाली अवैध बिल्डिंगों को यूडीसीपीआर नियमों के तहत संभव होगा। लेकिन इमारत को हाउस टैक्स का लगा होना अनिवार्य होगा।



Scanned with OKEN Scanner

N.B.T. पा.नं.४.

# मीरा-भाईंदर में रहती है गरबा और डांडिया की धूम, यहां आयोजन स्थलों पर लगती हैं कतारें

■ **अमित तिवारी, मीरा-भाईंदर:** मीरा-भाईंदर शहर गरबा प्रेमियों की पसंद बनते जा रहे हैं। गुरुवार से शुरू हो रहे नवरात्र में शहर के अलग-अलग हिस्सों में बड़े पैमाने पर गरबा-डांडिया के कार्यक्रमों का आयोजन हो रहा है। चुनावी वर्ष होने के कारण कोई भी नेता इसमें पीछे नहीं रहना चाह रहा है। विधायक प्रताप सरनाईक, विधायक गीता जैन और पूर्व विधायक नरेंद्र मेहता बड़े पैमाने पर कार्यक्रम का आयोजन कर रहे हैं। इनके अलावा, कई अन्य जगहों पर भी कार्यक्रमों का आयोजन हो रहा है।

**भाईंदर में लोटस नवरात्रि की धूम:** मेहता के ईस्ट-वेस्ट फाउंडेशन की तरफ से भाईंदर (पश्चिम) में विगत 5 साल से लोटस नवरात्र का आयोजन हो रहा है। हर साल लोटस नए आयाम स्थापित कर रहा है। कार्यक्रम में फिल्मी कलाकारों की उपस्थिति रहती है। लोटस की लोकप्रियता का आलम यह है कि विगत साल कुछ लोगों ने इसके नकली पास बना लिए थे। इस बार युवा गायक हैरी नाकूम अपने गीतों पर गरबा प्रेमियों को नचाएंगे।

AI Image



## नागोबा फाउंडेशन का 14वां साल

बीजेपी नेता शंकर विरकर के नागोबा फाउंडेशन ने इंद्रलोक में डांडिया का आयोजन किया है। यह फाउंडेशन का 14वां साल है। इस साल संस्था चश्मे का मुफ्त वितरण करेगी। विधायक गीता जैन इस साल से अपने रुद्र फाउंडेशन के तहत भाईंदर (पश्चिम) में नवरात्र का आयोजन कर रही हैं।

## प्रताप सरनाईक फाउंडेशन के चर्चे

सरनाईक की ओर से हर साल की तरह इस साल भी सेवन स्क्वायर स्कूल के पास नवरात्र का आयोजन किया जा रहा है। इस बार गुजराती गायक भाविक शास्त्री गीतों की प्रस्तुति करेंगे। इस नवरात्र की लोकप्रियता का अंदाजा इसी से लगाया जा सकता है कि पिछले साल मैदान के बाहर लंबी-लंबी कतारें लगी थी। इस वर्ष भी गरबा रसिको को इनाम दिए जाएंगे।

## मीरा रोड में कूल-कूल डांडिया

**एसी हॉल में 25 साल से हो रहा है कार्यक्रम का आयोजन**

कांग्रेस नेता राजीव मेहरा पिछले 25 साल से मीरा रोड के शीतल नगर मे डांडिया का आयोजन कर रहे हैं। इस साल भी वातानुकूलित डोम में डांडिया का आयोजन हो रहा है। इस बार गुजरात के लोकगायक गुलाब राठौर, भारत राठौर, श्वेता गुजराती आने वाले हैं।

N.B.T. पा.नं. ४.

# कभी भी ढहाई जा सकती हैं नालासोपारा की 41 इमारतें

■ सुरेंद्र नेगी, नालासोपारा



नालासोपारा के अग्रवाल नगरी स्थित डंपिंग ग्राउंड और एसटीपी प्लांट के लिए आरक्षित जमीन बनी विवादित 41 अवैध इमारतों में रहने वाले लगभग तीन हजार परिवारों की मुसीबतें कम होने का नाम नहीं ले रही हैं। हाई कोर्ट के इमारतें तोड़ने के आदेश के बाद यहां के रहिवासी घर बचाने के लिए दर-दर भटक रहे हैं, लेकिन उन्हें कहीं से भी राहत मिलती नजर नहीं दिख रही है। मनपा आयुक्त अनिल कुमार पवार ने 30 सितंबर तक कार्रवाई पर रोक लगाई थी। अब फिर से मनपा ने उन्हें जल्द से जल्द घर खाली करने का नोटिस जारी किया है। फिलहाल, किराए पर रहने वाले लोग घरों को खाली कर पलायन करने लगे हैं। हालांकि, जो खुद के घर में रह रहे हैं, वे डरे हुए हैं। अगर वे घर खाली करते हैं, तो उनकी जिंदगीभर की कमाई से खरीदा आशियाना आखों के सामने टूट जाएगा। इधर, मनपा का कहना है कि 2 दिन के अंदर बिजली विभाग को पत्र देकर इमारतों की बिजली-पानी आपूर्ति बंद कर दी जाएगी।

**इमारतों के बाहर लगाया नोटिस, बिजली-पानी काटा जाएगा**

बता दें कि नालासोपारा (पूर्व) अग्रवाल, वसंत नगरी स्थित सर्वे 22 से 30 तक काफी बड़ा भूखंड था। इसे वसई-विरार मनपा ने डंपिंग ग्राउंड के लिए आरक्षित किया था। आस-पास बस्ती बसने के बाद यहां से डंपिंग रिजर्वेशन हटाकर एसटीपी प्लांट के लिए आरक्षित कर दिया गया। इस भूखंड से सटकर कुछ जमीन अजय शर्मा के नाम पर थी। 2006 से पहले इस जमीन पर बहुजन विकास आघाडी के पूर्व नगरसेवक सीताराम गुप्ता और उनके भतीजे अरुण गुप्ता ने अवैध इमारतें बनानी शुरू कीं। 2010-12 तक यहां चार-चार मंजिला 41 इमारतें खड़ी हो गईं। सीताराम ने सभी इमारतों के फ्लैट बेच दिए। आरोप है कि इन अवैध इमारतों को बनाने में तत्कालीन सिडको और मनपा के अधिकारियों का पूरा संरक्षण मिला। कुछ साल पहले अजय ने अपनी जमीन पर हुए अतिक्रमण की मनपा में शिकायत की, लेकिन कोई कार्रवाई नहीं हुई। इसके बाद जमीन मालिक ने हाई कोर्ट में याचिका दायर की। कोर्ट के आदेश के बाद सीताराम और अरुण के खिलाफ धोखाधड़ी का मामला दर्ज किया गया और दोनों को जेल हुई।

## हर जगह लगा चुके हैं गुहार

हाई कोर्ट ने हाल में मनपा को सभी इमारतों को तोड़ने का आदेश जारी किया है। कोर्ट ने नवंबर तक कार्रवाई की रिपोर्ट मनपा से मांगी है। मॉनसून से पहले मनपा ने यहां रह रहे लगभग तीन हजार फ्लैट धारकों को नोटिस देना शुरू किया। इससे लोग घबराने लगे। घर बचाने के लिए रहिवासी सड़कों पर उतरकर विरोध प्रदर्शन करने लगे। लोग सीएम एकनाथ शिंदे के पास भी गए। हर जगह से उन्हें सिर्फ आश्वासन मिला। हालांकि, मनपा आयुक्त अनिल कुमार ने कहा था कि बारिश में किसी को बेघर नहीं किया जाएगा, इसलिए 30 सितंबर तक कार्रवाई न किए जाने का आश्वासन दिया गया। अब मनपा ने वहां पर नोटिस बोर्ड लगा दिया है कि जल्द से जल्द फ्लैट खाली किए जाएं। इसके बाद से लोगों की नींद हराम है। दो दिन पहले कुछ लोग आजाद मैदान में भी विरोध प्रदर्शन करने गए। साथ ही, सांसद सुप्रिया सुले से मुलाकात की। सुले ने उन्हें आश्वासन दिया है कि कार्रवाई रोकी जाएगी। सूत्रों से पता चला है कि रहिवासियों की एक टीम सुप्रीम कोर्ट में स्टे लेने के लिए गई है। इधर, मनपा के प्रभाग-डी के सहायक आयुक्त मोहन संखे ने बताया कि उन्हें फिर से नोटिस देने का काम शुरू किया है। बिजली-पानी आपूर्ति बंद की जाएगी।



The free Press Journal P 4,8

# CCTV helps catch peeping tom

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Suspecting that someone had been keeping an eye on her and her two young daughters, the woman installed a closed television (CCTV) camera outside her tenement to catch the peeping tom. Her presence of mind worked and a 24-year-old man Dhiraj Gore was caught red-handed on Thursday night. The incident has been reported from the Shivneri Nagar area in Bhayandar West.

According to the Bhayandar police, Gore who resides in the nearby colony would stealthily sneak into the backyard of the tenement - especially during the night hours - and watch the women from the rear window. The woman who had been having sleepless nights after she suspected that a peeping tom was spying on them, approached the office bearers of the local Maharashtra Nav Nirman Sena (MNS) unit who advised her to install the CCTV and keep a close watch on the live feeds. Finally, Gore was caught in the act at around 8pm on Thursday. The woman immediately informed deputy MNS city chief Abhinandan Chavhan who along with other members of the party reached the spot and caught hold of Gore. He was later handed over to the police.

It is suspected that the accused captured images and recorded videos of the female family members for the past more than two months.

Meanwhile an offence under the relevant sections of the Bhartiya Nyay Sanhita (BNS) for stalking and watching/ capturing the image of a woman engaging in a private act.

# Trio from UP held with pistol in Nallasopara

**FPJ News Service**
MIRA BHAYANDAR

The Pelhar police crime detection unit has arrested three Uttar Pradesh residents in Nallasopara with a country-made pistol and five live cartridges. The unit laid a trap and nabbed the trio - Krupashankar Bhullan Yadav alias Gorakh, 27, Sarvesh Ramjit Yadav, 27, and Rohit Janardhan Yadav, 28 - after a hot chase in the Om Sai Nagar.

# Plan to regulate caretaker hiring

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Taking a serious note of the horrifying incident wherein a drunk caretaker brutally assaulted a 78-year-old bed-ridden retired railway officer, the Mira Bhayandar-Vasai Vasai (MBVV) police have geared up to adopt a process to ensure that manpower supply agencies conduct proper checks of individuals before recruitment.

The MBVV police are considering making it mandatory for the manpower supply providers to conduct anticipated verification of job aspirants before recruiting and assigning any responsibilities. "We have formed a three-member committee comprising two police officials of the Deputy Commissioner of Police rank and led by the Additional Commissioner of Police, to conduct a detailed analysis of the issue and recommend a suitable regulatory process to outline protocols and processes needed to keep a tab on the staffing and payroll services agencies. Based on the committee's recommendations, appropriate steps will be taken to bring some control over such agencies," confirmed Commissioner of Police Madhukar Pandey.

At present, the rules governed and regulated under the Private Security Agency Regulation Act (PSARA), 2005 extend only to private security guard providers. Notably, the business of supplying manpower in the domestic sector has been flourishing owing to the rising demand for a workforce including caretakers, housemaids, nursing staff and drivers.

Scanned with OKEN Scanner

The free Press Journal P-5

# Man sentenced to 20 years for raping 11-yr-old daughter

## The father has left a scar in the life of the child, just to fulfil his lust

**Pranali Lotlikar**

MUMBAI

The Thane Special Prevention of Children Against Sexual Offenses (POCSOA) Act court has convicted a 32-year-old man who was held guilty for raping his 11-year-old daughter almost 8-10 times. The court has thus sentenced the man to suffer rigorous life imprisonment for a period of 20 years.

The court, presided over by Judge D S Deshmukh, in the 28-page order copy, has made efforts to show how a daughter, who is considered a father's princess, and the father, who is always her "hero", in this case, have left a scar in the life of the child, just to fulfil his lust.

The case dates back to August 2020, when Jia (name changed) approached her neighbour, and she was seen tense and stressed. When the neighbour questioned her carefully, Jia replied that her father, Abul Sheikh (name changed), was doing 'Ganda Kama', with her.

Jia was the eldest of all the children, the girl in her statement said that when her mother used to go outside for work, Abul, used to ask her siblings to go out of the house and raped her more than eight-ten times. Only in August, when the neighbour saw the child distressed, a complaint was filed against Abul with the Uttan Safari police.

The medical records asserted Jia's claims. The court order reads, "The child kept nodding her head and started crying (after identifying her father). She was then comforted and told that nobody can harm her and she is safe. While identifying the accused, the child held the hand of the presiding officer tightly and did not leave hand even after the accused again went behind curtains. After much persuasion, the child stopped crying. This was a natural act on the part of the victim child after seeing the accused."

> The child kept nodding her head and started crying after identifying her father in the court.

> The act of sexual assault on the child is to be viewed seriously, and such offences are to be dealt with in a stringent manner.
> **– POCSO court**

The accused, however, denied the allegations, stating that he was falsely involved in the case, but the evidence pointed out his guilt.

The court, thus while passing orders, held, "The POCSO Act, 2012 has been enacted to protect the children from the offense of sexual assault and sexual harassment to achieve what has been provided under section 15 and 39 of the Constitution. The act of sexual assault on the child is to be viewed seriously, and such offenses are to be dealt with in a stringent manner."

"In this case, the accused, being the father of the victim, had repeatedly subjected her to aggravated penetrative sexual assault and threatened her not to disclose the incident to anybody. The punishment therefore should commensurate with the act of sexual assault and should give a clear message to the society at large that perpetrators in such cases are dealt with an iron hand," the court added.

# Man loses ₹1.16 cr over 4 days in trading fraud

**FPJ News Service**

MUMBAI

A 49-year-old man was duped of Rs1.16 crore in just four days, after falling prey to share market investment fraud. According to the Manikpur police, the Vasai resident, who works at a senior position at an IT company, saw a dubious advertisement related to share market investment, while surfing the internet. Unsuspecting, he clicked on the provided link, after which his contact number got added in a WhatsApp group comprising 125 members.

Some of the members claimed to have earned huge profits through the guidance of the experts, who were managing the group. The complainant too decided to trade in the share market following expert guidance, said the police. The scammers asked him to share his account details and then instructed him to download a trading app.

From August 16 till August 20, the complainant transferred Rs1.16 crore in different accounts as directed by the fraudsters, said the police. However, when he did not get the promised returns, he demanded his money back. The cons asked him to pay more to refund the whopping amount.

Based on his complaint, a case has been registered by the police under sections 316 (criminal breach of trust), 318 (cheating) of Bharatiya Nyaya Sanhita as well as provisions 66C (identity theft), 66D (cheating by personation by using computer resource) of the Information Technology Act.

The man has also provided details of the contact numbers of the scammers, trading app's link and the details of the beneficiary accounts.

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL e-Paper

Thursday, OCTOBER 03, 2024, 11.30 AM

# Mira Bhayandar: MBVV Cops Arrest UP-Based Criminals In Nallasopara, Seize Country-Made Pistol And Live Cartridges.




The crime detection unit attached to the Pelhar police station have apprehended three Men who were found to be in possession of a country-made pistol and five live cartridges in Nallasopara. The trio turned out to be hardcore criminals from Uttar Pradesh who had apparently arrived in the city to commit some serious offence.

**Mira Bhayandar: The crime detection unit attached to the Pelhar police station have apprehended three Men who were found to be in possession of a country-made pistol and five live cartridges in Nallasopara. The trio turned out to be hardcore criminals from Uttar Pradesh who had apparently arrived in the city to commit some serious offence.**

Acting on a tip-off, personnel from the crime detection unit led by PSI-Tukaram Bhosale under the supervision of senior police inspector-Jitendra Vankotti laid a trap and nabbed the trio after a hot chase in the Om Sai Nagar area of Nallasopara (east).

The trio who have been identified as- Krupashankar Bhullan Yadav alias Gorakh (27), Sarvesh Ramjit Yadav (27) and Rohit Janardhan Yadav (28)-all hailing from Jaunpur in Uttar Pradesh. Upon frisking, the trio were found to be in possession of a country-made pistol, five live cartridges and two mobile phones.
With more than two dozen offences including- violent robbery, attempt-to-murder, possession of arms, cheating and extortion registered against him at various police stations including-Kerakat, Jalalpur, Buxa and Line Bazaar in Uttar Pradesh, Kripashankar is said to be the kingpin of the gang who has also been booked under the gangsters and anti-social activities (prevention) act, 1986.

**Five offences have been registered against his accomplice Sarvesh Yadav. "Detailed investigations including checking call detail records were underway to ascertain the motive behind the trio's arrival in the city with a firearm." said Vankotti.**

**----000----**

Scanned with OKEN Scanner